पोलीस उप-आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर
पोलीस आयुक्त कार्यालय, २, साधु वासवाणी पथ,पुणे-०१
फोन नं.०२०-२६२०८२८६/२६२०८२०२/२६१२३६६७
Email - sbpisecurity-pune@nic.in

जा.क्र.पोउआ/विशा/सुरक्षा/संरक्षण/ ५५३८/२०२४ पुणे, दिनांक - २७/०४/२०२४

**विषय :- अति महत्वाच्या संरक्षित व्यक्ती यांचे पुणे दौरा दरम्यान सुरक्षिततेच्या अनुषंगाने पुणे शहर परिसरात ड्रोन, रिमोंट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडर, पॅरामोटर, हॅन्डग्लायडर, हॉटएअर बलुन इत्यादीच्या उड्डान क्रियांना वापर न करण्याबाबत फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश -**

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, अति महत्वाच्या संरक्षित व्यक्ती यांची पुणे भेट दिनांक २९/०४/२०२४ व दिनांक ३०/०४/२०२४ रोजीचे पुणे दौरा अनुषंगाने **१. रेस कोर्स मैदान येथील हेलिपॅड २. सभेचे ठिकाण रेस कोर्स मैदान, सोलापुर रोड, वानवडी, पुणे ३. राजभवन, पुणे ४. सिंचनभवन हेलिपॅड, शिवाजीनगर, पुणे ५. रेस कोर्स मैदान ते राजभवन, पुणे ६. राजभवन, पुणे ते सिंचनभवन हेलिपॅड, शिवाजीनगर, पुणे रोड मार्ग** या ठिकाणी कार्यक्रमासाठी उपस्थित राहणार असुन संरक्षित व्यक्ती यांचे हेलिकॉप्टरचे लँडिंग रेस कोर्स, वानवडी हेलिपॅड व सिंचनभवन शिवाजीनगर हेलिपॅड येथील ग्राऊंडवर होणार आहे.

तरी संरक्षित व्यक्ती यांचे कार्यक्रमाचे अनुषंगाने दिनांक २८/०४/२०२४ व दिनांक ३०/०४/२०२४ रोजी पर्यंत कायदा व सुव्यवस्थेच्या अनुषंगाने पुणे शहर पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात ड्रोन कॅमे-याद्वारे छायाचित्रणाकरीता ड्रोन चालक / मालक / संस्था व नागरीक ड्रोन न वापरणेबाबत सत्यता पटवुन कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेता येईल अशी परस्थिती निर्माण झाली आहे. व त्याबाबत माझी खात्री झालेली आहे.

१) ज्याअर्थी दहशतवादी / राष्ट्रविरोधी घटक ड्रोन, रिमोंट कंट्रोल, मायको-लाईट,एअरक्राप्ट, पॅराग्लायडरचा वापर करुन त्यांचे हल्यामध्ये आणि त्याव्दारे व्हीव्हीआयपीना लक्ष करु शकतात मोठया प्रमाणावर सार्वजनिक जीवन धोक्यात आणू शकतात, सार्वजनिक मालमत्तेची नासधुस करु शकतात, आणि पुणे शहर पोलीस आयुक्तालय क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था बिघडवु शकतात.

२) त्याअर्थी अशा ड्रोन, रिमोंट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर व्दारे संभाव्य घातपात रोखण्यासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालयात अशा घटकांच्या कारवाया, ज्यासाठी काही प्रतिबंधात्मक सक्रीय उपाय योजना करणे आवश्यक आहे.

३) म्हणुन **मी प्रविण पवार, पोलीस सह. आयुक्त, पुणे शहर** आणि कार्यकारी दंडाधिकारी मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन-१९७३ (१९७४ चा कायदा II) चा कलम १४४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराव्दारे, ड्रोन, रिमोंट कंट्रोल, मायको-लाईट, एअरक्राप्ट, पॅराग्लायडर, पॅरामोटर, हॅन्डग्लायडर, हॉटएअर बलुन इत्यादीच्या **उड्डान क्रियांना** पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात **प्रतिबंध करण्याचे आदेश २८/०४/२०२४ ते ३०/०४/२०२४ रोजी पर्यंत** देत आहे. पुणे शहर पोलीसांकडुन हवाई पाळत ठेवणे किंवा पोलीस उप आयुक्त विशेष शाखा पुणे शहर यांचे लेखी विशिष्ट परवानगीने करण्यात येणारी कारवाई अपवाद राहील.

४) **हा आदेश दिनांक २८/०४/२०२४ रोजी रात्रौ ००.०१ पासुन दिनांक ३०/०४/२०२४ रोजी २४.०० वाजे पर्यंत त्यापुर्वी मागे घेतल्याशिवाय लागु राहील.**

५) या आदेशाचे उल्लघंन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय दंड सहिंता १८६०च्या कलम १८८ अन्वये दंडनिय असेल.

**सदरचा आदेश माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक २७/०४/२०२४ रोजी दिला आहे.**

पोलीस उप आयुक्त विशेष शाखा पुणे

२७।४।२४

**( प्रविण पवार )**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

**ठिकाण :- पुणे शहर**
**दिनांक :- २७/०४/२०२४**